मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# शहरी आणि ग्रामीण संस्कृतीचा मिलाप

## पवनाथडी जत्रेचा दुसरा दिवस : विविध खाद्यपदार्थांची मेजवानी

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

यंदाच्या पवनाथडी जत्रेत पिंपरी चिंचवड शहरवासियांना शहरी आणि ग्रामीण संस्कृतीचा मिलाप पाहायला मिळत आहे. चविष्ट अशा महाराष्ट्रीयन पाककलेच्या समृद्ध वारशाचा आनंद घेण्यासाठी खवय्यांनी शाकाहारी आणि मांसाहारी खाद्यपदार्थांच्या स्टॉल्सच्या बाहेर गर्दी केली. यंदाच्या जत्रेमध्ये प्रवेशद्वारापासूनच वैविध्यपुर्ण सजावट तसेच विद्युत रोषणाई करण्यात आली आहे जी आकर्षित करणारी ठरली आहे. तर विविध सांस्कृतिक कार्यक्रमांच्या आयोजनाने संध्याकाळी उपस्थित रसिक मंत्रमुग्ध झालेले पाहायला मिळाले. महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या वस्तूंना बाजारपेठ उपलब्ध व्हावी, महिलांमध्ये विपणन व विक्री कौशल्य विकसित व्हावे तसेच महिलांचे सबलीकरण करण्यासाठी महापालिकेच्या वतीने ११ जानेवारी ते १५ जानेवारी या कालावधीत सांगवी येथील पी.डब्ल्यू. डी. मैदानावर पवनाथडी जत्रा भरविण्यात आली आहे. या पाच दिवसीय जत्रेच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे शुक्रवारी जत्रेचा आनंद घेण्यासाठी लोकांनी मोठ्या संख्येने गर्दी केली होती. महापालिकेच्या वतीने आयोजित पवनाथडी जत्रा लोकांच्या आकर्षणाचा विषय ठरत आहे. याठिकाणी केलेली नेत्रदिपक विद्युत रोषणाई, रचनात्मक स्टॉल्सच्या रांगा, पारंपारिक बैलगाडी व शेती साहित्य आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरत असून सेल्फी काढण्यासाठी याठिकाणी लोकांची गर्दी होत आहे.



जत्रेमध्ये स्त्रियांसाठी कॉस्मेटिक्स, बॅग्स, साड्या, भांडी तर लहान मुलांसाठी खेळणी, पुस्तकं, कार्टूनच्या बाहुल्यांची असंख्य स्टॉल्स उपलब्ध आहेत. इतकंच नाही तर वेगवेगळी लोणची, पापड, कुरड्या, डाळी अशा घरगुती पदार्थांची खरेदी करण्यासाठी महिलांची गर्दी वाढताना दिसत आहे. पुरुषांसाठी चप्पल-बुट, खादीचे कपडे, कुर्ते, टोप्या, रुमाल, गॉगल्स, ब्रेसलेट्स, घड्याळ इत्यादींचे स्टॉल्स पाहायला मिळत आहेत. तर हुरड्यासह विविध शुद्ध शाकाहारी तसेच चमचमीत मांसाहारी खाद्यपदार्थ्यांच्या मेजवाणीवर खवय्ये ताव मारताना दिसत आहेत. या जत्रेमध्ये लहान मुलांसोबत तरूण, ज्येष्ठ नागरिकही आकाशी पाळणा, ड्रॅगन ट्रेन, झिग झॅग रोलर अशा अनेक अंगावर शहारे आणणाऱ्या खेळण्यांचा अनुभव घेताना दिसत आहेत. जत्रेच्या ठिकाणी सांस्कृतिक कार्यक्रमांचा आनंद घेण्यासाठी मोठ्या प्रमाणात लोकांची बैठक व्यवस्था असलेले सांस्कृतिक दालन उभारण्यात आले आहे. जेथे ऑर्केस्ट्रा, नाटक, लावणी, गोंधळ, सनई चौघडा, वाघ्या-मुरळींची जुगलबंदी अशा अनेक लोककलांचे तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत असून विविध भागातील पारंपरिक कलाकारांना आमंत्रित करण्यात आले आहे. शुक्रवारी सायंकाळी 'म्युझिक मेकर्स' हा सुमधूर गीतांचा बहारदार कार्यक्रम पार पडला ज्यामुळे उपस्थित रसिक मंत्रमुग्ध झाले. त्यानंतर 'खेळ रंगला पैठणीचा- होम मिनिस्टर' हा कार्यक्रम सादर झाला ज्यामध्ये अनेक महिलांनी सहभाग घेतला. दरम्यान, दिव्यांग, तृतीयपंथींच्या सामाजिक व आर्थिक समावेशनासाठी महापालिकेच्या वतीने प्रयत्न करण्यात येत असून त्यांच्यासाठीही स्टॉल्स राखीव ठेवण्यात आले आहेत. त्यांच्याद्वारेही येथे विविध वस्तू, खाद्यपदार्थांची विक्री करण्यात येत आहे. यासोबतच १८ ते ३० वयोगटातील युवक व युवतींसाठी रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी तसेच त्यांना कौशल्य प्रशिक्षण देण्यासाठी महापालिका राबवित असलेल्या लाईट हाऊस उपक्रमात तरूणांनी सहभाग घ्यावा, त्याबाबत माहिती घ्यावी यासाठी माहिती कक्ष उभारण्यात आला आहे. या स्टॉललाही तरूणांचा उस्फुर्त प्रतिसाद भेटत असल्याचे दिसुन येत आहे.

# मकर संक्रांतीच्या साहित्याने बाजारपेठ फुलली!

## हलव्याच्या दागिन्यांना मागणी; तिळाचे दर वाढल्याने पदार्थ महाग

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

नवीन वर्षातील पहिला सण म्हणजे मकर संक्रांत. विवाहिता, लहान मुले यांच्या दृष्टीने हा सण अत्यंत महत्वाचा मानला जातो. याशिवाय, प्रत्येकजण एकमेकांना तिळगूळ देऊन स्नेह वृद्धिंगत करत असतात. यावर्षी संक्रांत सोमवारी (ता.१५) साजरी केली जाणार आहे. या सणाच्या खरेदीसाठी सध्या बाजारपेठा गर्दीने फुललेल्या दिसत आहेत. संक्रांतीच्या पूजेसाठी आवश्यक सामान, तिळगूळ, तिळाच्या वड्या, लहान मुलांचे व महिलांचे हलव्याचे दागिने, सजावटीच्या वस्तू, सुवासिनींनी लुटायचे वाण, बोरन्हाणाचे साहित्य अशा वस्तूंना मोठी मागणी आहे. मकर संक्रांतीनंतर लहान मुलांचे बोरन्हाण केले जाते. यासाठी लागणाऱ्या हलव्याच्या दागिन्यांची मागणी वाढली आहे. लहान मुलींसाठी बांगड्या, अंगठी, हार, बिंदी, बाजूबंद, कंबरपट्टा तर लहानग्यांसाठी मोरपीस लावलेला मुकुट, बासरी,



हार अशा दागिन्यांचे संच बाजारात विक्रीस आलेले आहेत. तसेच बोरन्हाणासाठी बिस्कीट,चॉकलेट्स, बोरे, रेवड्या, भुईमुगाच्या शेंगा याबरोबरच सजावटीच्या साहित्याची खरेदी केली जात आहे. नवविवाहित महिलांनाही हळदीकुंकवाच्या कार्यक्रमात हलव्याचे दागिने घातले जातात. या दागिन्यांमध्ये मंगळसूत्र, नथ, कानातले, बाजूबंद, हार, मेखलासाडी पिन, कंबरपट्टा वैशिष्ट्यपूर्ण प्रकार पाहायला मिळत आहेत. गेल्या काही वर्षांपासून आपल्याला हवे तसे दागिने बनवून घेण्याकडेही अनेक जणींचा कल आहे. या दागिन्यांच्या संचांची किंमत ३०० ते ४०० रुपयांपासून पुढे आहे. मकर संक्रांतीच्या काळात मागणी वाढल्याने तिळाचे दर वाढले आहेत. घाऊक बाजारात कच्च्या तिळाचा दर १८० ते २०० रुपये प्रति किलो असा होता. मात्र, संक्रांतीमुळे हा दर वाढून २३० ते २५० रुपये प्रतिकिलो असा झाला आहे. परिणामी, तिळाची वडी, तिळाचे लाडू यांचे देखील दर वाढले आहेत. तिळगुळाचा लाडू , तिळ शेंगदाण्याची वडी यांचे दर प्रतिकिलो ३२० रुपयांवर आलेले आहेत, अशी माहिती विक्रेत्यांनी दिली. संक्रांतीपासून ते रथसप्तमीपर्यंत चालणाऱ्या हळदीकुंकवाच्या कार्यक्रमांना विविध वस्तू वाण म्हणून लुटण्याची पध्दत आहे. यासाठी देखील असंख्य प्रकारच्या वस्तू बाजारात आलेल्या आहे.

# वायुगळती झालीच तर करणार काय?

## शहरातील विविध औद्योगिक क्षेत्रांच्या ठिकाणी महापालिकेचे मॉक ड्रिल

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

शहरातील औद्योगिक आस्थापनांनी सुरक्षेला प्राधान्य देऊन घातक रासायनिक पदार्थांची हाताळणी करताना किंवा वाहतूक करताना आवश्यक खबरदारी घेणे गरजेचे आहे. महापालिकेच्या वतीनेही याबाबत विशेष काळजी घेतली जात असून भविष्यात अशा प्रकारची कोणतीही दुर्घटना घडल्यास तिच्यावर प्रभावीपणे नियंत्रण आणण्यासाठी शहरातील आपत्कालीन व्यवस्थापन करणाऱ्या यंत्रणांशी समन्वय साधून शहरातील विविध औद्योगिक क्षेत्रांच्या ठिकाणी मॉक ड्रिलचे आयोजन केले जाईल जेणेकरून जिवीत आणि पर्यावरण हानी होण्यापासून बचाव केला जाऊ शकतो, असे प्रदीप जांभळे पाटील म्हणाले. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने काल (दि.१२) निगडी येथील सेक्टर २३ जलशुद्धीकरण केंद्र येथे क्लोरीन वायुगळती नियंत्रण या विषयावरील आपत्कालीन सरावाचे आयोजन करण्यात आले होते, यावेळी अतिरिक्त आयुक्त जांभळे पाटील बोलत होते. या सरावावेळी महापालिका, एनडीआरएफ, पोलीस, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, औद्योगिक सुरक्षा संचलनालय यांचा सहभाग होता. या मॉक ड्रीलवेळी महापालिकेचे सहआयुक्त चंद्रकांत इंदलकर, यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. राजेंद्र वाबळे, मुख्य अभियंता श्रीकांत सवणे, उपआयुक्त मनोज लोणकर, आपत्ती व्यवस्थापन प्रमुख ओमप्रकाश बहिवाल, विशेष अधिकारी किरण गायकवाड, चीफ केमिस्ट प्रशांत जगताप, कार्यकारी अभियंता डॉ. रवी तुपसाखरे, सुरक्षा अधिकारी प्रमोद निकम तसेच एनडीआरएफचे सेकंड इन कमांडंट रविप्रकाश, दिपक तिवारी, सहाय्यक कमांडंट प्रविण धट, पोलीस निरीक्षक अजयकुमार यादव,



ईश्वरदास मते, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे उप आयुक्त डॉ. शिवाजी पवार, सहाय्यक आयुक्त डॉ. विशाल हिरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक अमरनाथ वाघमोडे, पोलीस उपनिरीक्षक अनिल टारपे, सहाय्यक पोलीस निरिक्षक विशाल जाधव, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक डी. डी. चौधरी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी सुनंदा जाधव, औद्योगिक सुरक्षा संचालनालयाचे सहाय्यक संचालक संजय गिरी, पुणे जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी विठ्ठल बनोटे, दंगल नियंत्रण पथकाचे प्रमुख संदीप देशमुख, महापालिकेच्या अग्निशमन विभागाचे अधिकारी ऋषिकांत चिपाडे, गौतम इंगवले तसेच जलशुद्धीकरण प्रकल्पाचे कर्मचारी उपस्थित होते. महापालिकेच्या जलशुद्धीकरण केंद्रामध्ये क्लोरीनचा वापर जलशुद्धीकरणासाठी केला जातो. याकरिता याठिकाणी क्लोरीनचे सिलेंडर ठेवलेले असतात. कोणत्याही ठिकाणी रासायनिक विषारी वायुगळती झाल्यास ती दुर्घटना कशा पद्धतीने हाताळावी यासाठी महापालिकेच्या पुढाकाराने सेक्टर क्र. २३ येथील जलशुद्धीकरण केंद्राच्या परिसरात आपत्कालीन सराव घेण्यात आला. आपत्कालीन परिस्थितीत हाताळणाऱ्या संलग्न यंत्रणांमध्ये समन्वय राहावा यासाठी हा सराव उपयुक्त ठरणार आहे, असे आपत्कालीन विभागाचे सहआयुक्त चंद्रकांत इंदलकर म्हणाले. एनडीआरएफचे पोलीस निरीक्षक अजयकुमार यादव विषारी वायुगळती रोखण्याबद्दल माहिती सांगताना म्हणाले, क्लोरीन हा अतिशय घातक वायू आहे. हा हवेपेक्षा जड वायू असल्यामुळे शक्यतो तो जमिनीवरच पसरतो. नागरिकांनाही याबाबत अवगत करणे गरजेचे असून ज्या भागात क्लोरीनचा वापर केला जातो त्या भागातील नागरिकांमध्ये वायुगळतीबाबत जनजागृती करणे गरजेचे आहे. वायुगळती होऊ नये यासाठी जलशुद्धीकरण केंद्रांची वारंवार तपासणी करणे गरजेचे आहे. क्लोरीनचा वापर करणाऱ्या व्यक्तीला क्लोरीनच्या सर्व गुणधर्मांबाबत माहिती असणे आवश्यक आहे. वायुगळती झाल्यास महापालिकेने शहरातील सर्व आपत्कालीन यंत्रणांसोबत समन्वय साधणे गरजेचे आहे. यासोबतच वायुगळतीबाबत नागरिकांमध्ये अफवाही पसरतात, ज्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होऊन परिस्थिती हाताबाहेर जाऊ शकते. अशा घटनांबाबत समाज माध्यमातूनही जनजागृती झाली पाहिजे. प्रत्यक्ष ठिकाणी आणि अप्रत्यक्ष ठिकाणी वायुगळतीबाबत वेगवेगळा कृती आराखडा तयार करणे गरजेचे आहे. तसेच साहित्य सुरक्षितता माहिती पत्रक बनविणे खूप गरजेचे आहे. ज्यामध्ये कोणत्याही प्रशासकीय किंवा औद्योगिक ठिकाणी वापरात येणाऱ्या घातक रासायनिक घटकांची संपूर्ण माहिती नमूद असायला हवी. त्यामध्ये वापरात येणाऱ्या रासायनिक घटकाचे गुणधर्म, वायुगळती झाल्यास बाळगायची सावधगिरी, नियंत्रणाचे उपाय आणि रासायनिक घटकांमुळे आरोग्यावर होणारे परिणाम असे सर्व घटक असायला हवेत, असे अजयकुमार यादव यावेळी म्हणाले.

# मोबाईल हेच तरुणाई समोर आव्हान : राहुल गिरी

## मोबाईलचा सकारात्मक वापर केला पाहिजेत

**पुणे।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

मोबाईल मुळे ओठावरचा संवाद बोटांवर आला आहे. मानव मोबाईलच्या पुरता आहारी गेला आहे.यामुळे पालकांसोबतीचा संवाद हरवला आहे.मायेचा ओलावा कमी झालाय. केरळच्या एका मुलाने हमालचे काम करता – करता मोबाईलच्या साहाय्याने यूपीएससीची परीक्षा पास झाला तर काहीजण पब्जीच्या आहारी जावून जीव गमवला आहे.मोबाईलचा सकारात्मक वापर केला पाहिजेत. आज व्यसनमुक्ती केंद्रात मोबाईल व्यसनमुक्तीसाठी एक स्वातंत्र कक्ष सुरू केला आहे. हि दुर्दैवाची बाब आहे. आज तरुणांसमोर मोबाईल हे एक मोठे आव्हान बनले आहे. असे मत युवा व्याख्याते राहुल गिरी यांनी व्यक्त केले. शरद नगर येथील स्वामी विवेकानंद लोकसेवा प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित केलेल्या विवेकानंद व्याख्यानमालेत तरुणाईचे आव्हान आणि जबाबदारी या विषयावर ते बोलत होते. यावेळी माजी नगरसेवक राजाभाऊ गोलांडे, संजय नेवाळे, नामदेव ढाके, कामगारनेते विष्णू नेवाळे, उद्योजक महादेव कवितके,अजय



पाताडे, सचिन सानप,शिवाजी अंबिके, मंडळाचे अध्यक्ष रामराजे बेंबडे, उपाध्यक्ष संतोष ठाकूर आदी मान्यवर उपस्थित होते. गिरी पुढे म्हणाले कि,शिक्षणाने माणूस घडतो. मात्र जास्त शिकलेलेच भ्रष्टाचार करतात. आपल्या आजूबाजूला असलेले नकारात्मक व्यक्तीना बाजूला करा.आपल्या मुलांमध्ये महापुरुषांचेविचार,संस्कार रुजवले पाहिजेत. वेस्ट संस्कृतीचे आचरण न करता बेस्ट स्विकारावे. या मातीतील तरुणांच्या मनात विवेकानंद स्वामींसारखे सामर्थ्य निर्माण करावे. एका अभ्यासानुसार आज जे मोबाईलच्या आहारी गेलेत त्यांच्यामध्ये ब्रेन ट्यूमरच्या प्राथमिक स्टेज लक्षणे आढळून येत आहे. आपण ज्या क्षेत्रात कार्यरत आहोत तेच कार्य प्रामाणिक पणे करणे हेच स्वामींना अभिप्रेत आहे. आधुनिकतेच्या काळात माय,माती, माणुसकी विसरता कामा नये. स्वामी विवेकानंद लोकसेवा प्रतिष्ठान, रोटरी क्लब आणि देसाई हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या मोफत नेत्र तपासणी, चष्मेवाटप व मोती मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिरात १८० लोकांची तपासणी केली. ७८रुग्णाना चष्मे वाटण्यात केली व २४ लोकांना मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी पाठवण्यात आले. प्रास्ताविक विश्वास सोहोनी यांनी केले सूत्रसंचालन रामचंद्र पाटील यांनी तर आभार श्रेणीक पंडीत यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अशोक हाडके, हंबीरराव भिसे, शंकर बनकर, सिद्राम मालगत्ती, दिलीप मांडवकर, बापू साळुंखे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# मेट्रो स्थानकांत स्वतंत्र वाहनतळ

## पालिकेची ४०० मीटर अंतरातील भूखंड देण्याची तयारी





**पुणे। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** पुणेरी मेट्रोचे काम पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून (पीएमआरडीए) सुरू आहे. हिंजवडी ते शिवाजीनगर मार्गावरील या मेट्रोच्या स्थानकांना काही ठिकाणी वाहनतळासाठी जागा मिळत नसल्याने कोंडी झाली होती. यावर पीएमआरडीएने महापालिकेकडे आरक्षित भूखंडांची मागणी केली होती. महापालिकेने मेट्रो स्थानकांच्या १०० ते ४०० मीटर अंतरातील आठ भूखंड देण्याची तयारी दर्शविली असून, त्यावर लवकरच अंतिम निर्णय होणार आहे. पुणेरी मेट्रोची एकूण २३ स्थानके आहेत. त्यांपैकी केवळ माण, बालेवाडी आणि शिवाजीनगर या तीनच स्थानकांना वाहनतळासाठी जागा मिळाली आहे. इतर स्थानकांना वाहनतळासाठी जागा मिळत नसल्याने पीएमआरडीएने अखेर महापालिकेकडे धाव घेतली. याबाबत पीएमआरडीएने मागील महिन्यात महापालिका आयुक्त विक्रम कुमार यांना पत्र पाठविले. त्यात बाणेर आणि बालेवाडी परिसरातील आठ आरक्षित भूखंडांची मागणी करण्यात आली आहे. पीएमआरडीएला हे भूखंड मिळाल्यास बालेवाडी क्रीडा संकुल, एनआय सीएमएआर, रामनगर, लक्ष्मीनगर, बालेवाडी फाटा, बाणेरगाव आणि बाणेर या सात मेट्रो स्थानकांना वाहनतळासाठी स्वतंत्र जागा मिळणार आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, याआधी पीएमआरडीएने मेट्रो स्थानकांच्या वाहनतळासाठी महापालिकेकडे जागा मागितली होती. परंतु, या जागा वेगवेगळ्या ठिकाणी आणि खासगी मालकीच्या होत्या. त्यामुळे महापालिकेने याला नकार दिला होता. त्याऐवजी आरक्षित भूखंड देण्याची तयारी महापालिकेने दर्शवली होती. त्यानंतर पीएम आरडीएने आरक्षित भूखंड शोधून सोईच्या भूखंडांची यादी महापालिकेला दिली आहे. हे सर्व भूखंड सात मेट्रो स्थानकांच्या सुमारे १०० ते ४०० मीटर अंतरावर आहेत. त्यामुळे त्या ठिकाणी स्वतंत्र वाहनतळ उभारणे सोईचे ठरणार आहे. यावर महापालिकेकडून लवकरच निर्णय अपेक्षित आहे. पीएमआरडीएने मागितलेले भूखंड हे वेगवेगळ्या कारणांसाठी आरक्षित आहेत. त्यांचा वाहनतळासाठी वापर करावयाचा झाल्यास ते आरक्षण बदलावे लागणार आहे. याबाबतचा प्रस्ताव महापालिकेच्या मालमत्ता व व्यवस्थापन विभागाने आरक्षित भूखंड समितीकडे पाठविला आहे. समितीकडून शिक्कामोर्तब झाल्यानंतर हा प्रस्ताव महापालिका आयुक्तांकडे पाठवला जाणार आहे, अशी माहिती सूत्रांनी दिली. इतर स्थानकांना वाहनतळासाठी जागा मिळत नसल्याने पीएमआरडीएने अखेर महापालिकेकडे धाव घेतली. याबाबत पीएमआरडीएने मागील महिन्यात महापालिका आयुक्त विक्रम कुमार यांना पत्र पाठविले. त्यात बाणेर आणि बालेवाडी परिसरातील आठ आरक्षित भूखंडांची मागणी करण्यात आली आहे. पीएमआरडीएला हे भूखंड मिळाल्यास बालेवाडी क्रीडा संकुल, एनआय सीएमएआर, रामनगर, लक्ष्मीनगर, बालेवाडी फाटा, बाणेरगाव आणि बाणेर या सात मेट्रो स्थानकांना वाहनतळासाठी स्वतंत्र जागा मिळणार आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, याआधी पीएम आरडीएने महापालिकेने याला नकार दिला होता. त्याऐवजी आरक्षित भूखंड देण्याची तयारी महापालिकेने दर्शवली.

> **“पीएमआरडीएला आठ भूखंड देण्याचा प्रस्ताव आहे. हे भूखंड ३० वर्षांच्या भाडेकराराने दिले जातील. त्यासाठी वर्षाला रेडीरेकनर दराच्या अडीच टक्के भाडे असेल. भूखंडांचे आरक्षण बदलण्याचा निर्णय झाल्यानंतर आयुक्तांकडून त्यावर अंतिम शिक्कामोर्तब होईल.**
> **– राजेंद्र थोरात,**
> **उपअभियंता, मालमत्ता विभाग, पुणे महापालिका**

> **“पीएमआरडीएने बाणेर आणि बालेवाडी भागातील आठ भूखंड महापालिकेकडे मागितले आहेत. महापालिकेकडून यावर सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे. यामुळे मेट्रो स्थानकांसाठी स्वतंत्र वाहनतळाची सुविधा उभारण्यासाठी जागा उपलब्ध होणार आहे.**
> **– रामदास जगताप,**
> **उपायुक्त, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण**

# जागावाटपाबाबत अद्याप कोणताही निर्णय नाही

## कुणालाचं तरी नाव पुढे करुन मत मागण्याची गरज नाही : पवार

**पुणे। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** इंडिया आघाडीचे नेतृत्व मल्लिकार्जुन खरगे यांनी स्विकारावं अशी सूचना काही सहकार्यांनी केली, त्याला अनेकांनी संमती देखील दिली. त्याचप्रमाणे संयोजक म्हणून नितीश कुमारांनी जबाबदारी घ्यावी अशी सूचना करण्यात आली होती. परंतु संयोजक पदाची गरज नसल्याचं मत नितीश कुमारांनी मांडलं. त्यामुळे संयोजक पदाची नियुक्ती करण्यात आली नाही, अशी प्रतिक्रिया राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवारांनी दिली. एकविचाराने निवडणुकीला सामोरे जाण्याचा विचार असल्याचं शरद पवारांनी या बैठकीनंतर प्रतिक्रिया दिली. इंडिया आघाडीच्या बैठकीचं ऑनलाइन माध्यमातून आयोजन करण्यात आलं होतं. या बैठकीमध्ये शरद पवार, ममता बॅनर्जी, सोनिया गांधी, राहुल गांधी यांनी देखील हजेरी लावली. अवघ्या काही महिन्यांत लोकसभेच्या निवडणुकांचं बिगुल वाजणार आहे. त्याच पार्श्वभूमीवर



इंडिया आघाडीची ही बैठक अत्यंत महत्त्वाची मानली जात होती. लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर जागावाटपाच्या संदर्भात ही बैठक अत्यंत महत्त्वाची मानली जात होती. परंतु या बैठकीत जागावाटपासंदर्भात काही निर्णय झाला नसल्याचं शरद पवारांनी म्हटलं. जागावाटपाच्या संदर्भात काही वाद आहते, ते मिटवले जावे याबाबत या बैठकीत चर्चा झाल्याची माहिती शरद पवारांनी दिली. पुढे त्यांनी म्हटलं की, एकत्रित सभा घेण्यासाठी एक कमिटी स्थापन व्हावी अशा सूचना देखील अनेकांनी मांडल्या. आज देशाला पर्याय देण्यासाठी विविध राजकीय पक्ष सत्ताधा-यांच्या विरोध एकत्र येत आहेत. हिच इंडिया आघाडी जमेची बाजू आहे. इंडिया आघाडीमधून पंतप्रधान पदाचा चेहरा कोण असणार यावर राजकीय वर्तुळात चर्चा सुरु आहेत. यावर शरद पवारांनी म्हटलं की, कुणाचं तरी नाव प्रोजेक्ट करुन त्याच्या नावे मतं मागावी अशी गरज वाटत नाही. आम्हाला विश्वास आहे की, आम्ही देशाला पर्याय देऊ शकतो. मोरारजी देसाई यांचे उदाहरण देत इंडिया आघाडीत सध्या तरी पंतप्रधान पदाचा चेहरा नसावा. ''अयोध्येतील श्रीरामांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा होणार आहे, मला त्याचं आमंत्रण आलेलं नाही. मी म्हटलं काही हरकत नाही, पण मी जाणार.

# मला शोलेमधल्या रामगडची टाकीच आठवली

## मी पाहिलेली भ्रष्टाचारी ग्रामपंचायत म्हणजे रामगड




**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** पुण्यामध्ये आज मनसेच्या सरपंच व ग्रामपंचायत सदस्यांचा मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्याला मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी राज ठाकरेंनी उपस्थित सर्व सरपंच व ग्रामपंचायत सदस्यांना ग्रामस्वच्छतेच्या मुद्द्यावर मार्गदर्शन केलं. यावेळी राज ठाकरेंनी त्यांच्या खास शैलीत शोले चित्रपटातल्या रामगड गावाचं उदाहरण देताच उपस्थितामध्ये हशा पिकला. माझ्या शालेय जीवनात मी पाहिलेली सर्वात भ्रष्ट ग्रामपंचायत म्हणजे शोलेमधली रामगडची ग्रामपंचायत, असा टोला राज ठाकरेंनी यावेळी लगावला. प्रकृती बरी नसल्यामुळे आपण मेळाव्याला येणार नव्हतो, पण तुम्ही सगळे इतक्या लांबून आल्यामुळे मीही आलो, असं राज ठाकरे यावेळी म्हणाले. तुम्हाला एकच सूचना करायची आहे. तुम्ही प्रामाणिक आहात, लोकांचे प्रश्न सोडवण्यासाठी इच्छुक आहात. मला तुम्हाला एवढंच सांगायचं आहे की गाव स्वच्छ ठेवा. आपला परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी पैसा लागत नाही, इच्छा लागते. जेवढा परिसर स्वच्छ ठेवाल, तेवढी रोगराई लांब राहाते. आपल्या देशातच अशी अनेक गावं मी पाहिली आहेत, असं राज ठाकरे म्हणाले. मी ८९ सालापासून राजकारणात आलोय. अनेकदा महाराष्ट्र फिरलो, अनेक गावांमध्ये गेलो. सगळ्या ठिकाणी मला स्वच्छतेबाबत दुरवस्था दिसली. त्या अस्वच्छ वातावरणामुळे तुमचं मनही अस्वच्छ होतं. ग्रामीण भागातले तरुण शहरात येतायत. शहरातले तरुण विदेशात जातायत. ते का जातात? सभोवतालचं वातावरण त्यांना चांगलं मिळत नाहीये. तिथे जाऊनही अशा काय फार मोठ्या नोकऱ्या करतायत? सगळेच फार काही चांगल्या नोकऱ्या करत नाहीत. तो डंकी चित्रपट आलाय ना. लपून-छपून परदेशात जायचं. आणि तिथे स्वीपर म्हणून काम करायचं. ते तर इथेही मिळतं. आजूबाजूचं वातावरण चांगलं ठेवणं आवश्यक आहे. गावातल्या मुलांना त्या वातावरणात नवनवीन कल्पना सुचल्या पाहिजेत, असं राज ठाकरेंनी नमूद केलं. दरम्यान, राज ठाकरेंनी यावेळी बोलताना शोले चित्रपटातला प्रसंग सांगितला. मी एका गावात गेलो होतो. नाव नाही सांगत मुद्दाम. त्या गावात लोडशेडिंग होतं. पण त्यालाही काही अर्थ नाही. ४८ तास वीज यायचीच नाही. स्वच्छतेची वाईट अवस्था होती. त्या गावात मी एक टाकी पाहिली. तेव्हा मला शोले चित्रपटातल्या रामगड गावाचीच आठवण झाली, असं राज ठाकरे म्हणाले. मी विचार करत होतो की माझ्या शालेय जीवनात मी पहिल्यांदा पाहिलेली भ्रष्टाचारी ग्रामपंचायत म्हणजे रामगड ग्रामपंचायत. तुम्ही शोलेमधली ती ग्रामपंचातय पाहिली आहे ना. त्या गावातल्या सर्वात श्रीमंत ठाकूरच्या घरात लाईट नाही. पण त्या गावात टाकी आहे. त्या ठाकूरचा बाप चढवणार होता का पाणी? त्या गावात मी जेव्हा टाकी पाहिली, तेव्हा मला रामगडची टाकीच आठवली. त्या टाकीला बाकी काहीच नव्हतं. तुम्ही प्रामाणिक आहात, लोकांचे प्रश्न सोडवण्यासाठी इच्छुक आहात. अशा गोष्टी मनसेच्या कार्यकर्त्यांकडून होता कामा नयेत. गावात गेल्यानंतर आधीच्या पिढ्यांमधल्या लोकांना वाटलं पाहिजे की काम करावं तर या लोकांनी, नाहीतर करू नये, असा सल्ला राज ठाकरेंनी उपस्थितांना दिला.

# देशातील बॉम्बस्फोटाचा दहशतवाद्यांचा कट उधळला

## राष्ट्रीय तपास यंत्रणेकडून पुणे पोलिसांना दहा लाखांचे रोख बक्षीस



**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** कोथरुडमध्ये दुचाकी चोरताना दहशतवाद्यांना कोथरुड पोलिसांनी पकडले. पोलिसांच्या तत्परतेमुळे देशभरात बॉम्बस्फोट घडविण्याचा डाव उधळला गेल्याने राष्ट्रीय तपास यंत्रणेकडून (एनआयए) कोथरुड पोलीस ठाण्यातील पाच कर्मचाऱ्यांना दहा लाखांचे रोख बक्षीस आणि प्रमाणपत्र प्रदान केले. एनआयएचे अधिकारी इंगवले आणि पोलीस आयुक्त रितेश कुमार यांच्या हस्ते पोलीस कर्मचाऱ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. अतिरिक्त पोलीस आयुक्त रामनाथ पोकळे, अतिरिक्त आयुक्त अरविंद चावरिया आदी उपस्थित होते. कोथरुड पोलीस ठाण्यातील अमोल नजन, प्रदीप चव्हाण, बाला रफिक शेख, अनिकेत जमदाडे, ज्ञानेश्वर पांचाळ, वरिष्ठ पोलीस निरीक्षक हेमंत पाटील, पोलीस निरीक्षक नीलीमा पवार यांना गौरविण्यात आले. गेल्या वर्षी जुलै महिन्यात पुण्यातील कोथरुड भागात दुचाकी चोरताना इम्रान खान, मोहम्मद साकी, मोहम्मद आमल यांना अटक करण्यात आली होती. कोंढव्यात आरोपी साकी, खान, आमल वास्तव्यास होते. त्यांच्या घराची झडती घेण्यात आली. तेव्हा त्यांचे बंदी घातलेल्या अल सुफा या दहशतवादी संघटनेशी संबंध असल्याचे तपासात उघडकीस आले होते. राजस्थानात चितोड परिसरात त्यांच्याविरुद्ध स्फोटके बाळगल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. तेव्हापासून ते पसार झाले होते. तपासात तिघे दहशतवादी आयसिसच्या संपर्कात असल्याचे उघडकीस आले होते. महाराष्ट्र, गोवा, तेलंगणात आयसिसच्या विचारधारेचा प्रसार करण्याचे काम त्यांच्याकडे सोपविण्यात आले होते. दहशतवाद्याकडून पिस्तूल, स्फोटके सापडले होते. दहशतवादी कारवायांचे प्रशिक्षण देण्यासाठी कोंढव्यात प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. बॉम्बस्फोट घडविल्यानंतर अटक टाळण्यासाठी त्यांनी दुर्गम भागात लपण्याची जागा शोधली होती. पुण्यातील महत्वाच्या लष्करी संस्थांच्या परिसराचे त्यांनी ड्रोन कॅमेऱ्याद्वारे चित्रीकरण केले होते.